मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 26 एप्रिल 2024 | पान- 1

# दामिनी पथकांचा रोडरोमिओंना दणका!

## दोन महिन्यांत दीडशेहून अधिक टवाळखोरांवर कारवाई : शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात दामिनी पथकांची करडी नजर

**पिंपरी | प्रतिनिधी**

कठोर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारून पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातील दामिनी पथकांनी शहरातील टवाळखोरांना चांगलाच दणका दिला आहे. मागील दोन महिन्यात पथकातील महिला पोलिसांनी दीडशेहुन अधिक टवाळखोरांवर कारवाई केली आहे. यातील बहुतांश कारवाया शाळा, महाविद्यालयात परिसरात करण्यात आल्या आहेत.

उद्योगनगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात नोकरीनिमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या महिलांसह शाळकरी मुलींची मोठी वर्दळ असते. याचा गैरफायदा घेत टवाळखोर मंडळी दिवसभर रस्त्याने घिरट्या घालताना दिसून येतात.

एकट्या महिला, मुलीकडे पाहून जोरजोरात हॉर्न वाजवणे, शिट्या मारणे, गाणी म्हणणे, अशी कृत्य बेधडकपणे केली जातात. या पार्श्वभूमीवर आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण ३३ दामिनी पथके तयार करण्यात आली आहेत. वर्षाच्या सुरुवातीपासून ही पथके सक्रिय झाली आहेत. त्यांच्याकडून धडक कारवाया सुरू आहेत. मागील दोन महिन्यात तब्बल १५१ रोडरोमिओंवर कारवाई केली आहे. दामिनी पथकांकडून सुरू असलेल्या या कारवाईचे महिलावर्गातून कौतुक होत आहे.

### ६६ महिला पोलिसांची नजर

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात एकूण १८ पोलीस ठाणी येतात. यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात गरजेनुसार दामिनी पथक नियुक्त करण्यात आले आहेत. शहर परिसरात एकूण ३३ दामिनी पथक तैनात आहेत. यामध्ये एकूण ६६ महिला अंमलदार कार्यरत आहेत.




### तब्बल 1 हजार 694 महिलांना मदत...

» दामिनी पथकातील महिला पोलिसांची हद्दीत नियमित गस्त सुरु असते. रस्त्यावर एकटे फिरणाऱ्या महिलांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते. तसेच, चौकाचौकात उभे असलेल्या टवाळखोरांवर देखील दामिनी करडी नजर ठेऊन असतात. महिला देखील आवर्जून आपल्या अडचणी दामिनी पथकांकडे मांडतात. त्यानुसार, दामिनी पथकातील महिला पोलीस आवश्यक मदत करतात. मागील दोन महिन्यात गस्तीवर असताना दामिनी पथकाने 1 हजार ६९४ महिलांची मदत केल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे.

### तक्रार पेटीतील तक्रारींचे निराकरण

रस्त्याने चालणाऱ्या महिलांसोबत शाळा, कॉलेजच्या मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी दामिनी पथकावर आहे. मागील दोन महिन्यात दामिनी पथकांनी एकूण ७०३ शाळा, कॉलेजला भेटी दिल्या आहेत. दामिनी पथकाकडून शाळेत असलेल्या तक्रार पेट्या उघडून विद्यार्थिनींच्या समस्येचे निराकरण केले जाते. तक्रार पेटीत आलेल्या २७ विद्यार्थिनींच्या तक्रारींचे दामिनी पथकाने समाधान केल्याची नोंद आहे.

### ३०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

गस्ती दरम्यान दामिनी पथकांना अनेक गैरप्रकार नजरेस पडतात. त्यानुसार पथकाकडून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. मागील दोन महिन्यात सीआरपीसी ११०, ११२, ११७ नुसार एकूण ३०० जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

### पुरुष बिट मार्शलसोबत दामिनी पथकही घटनास्थळी

महिलांचे हेल्पलाईन १०९१ किंवा डायल ११२ वर मदतीसाठी कॉल येतात. अशा वेळी हद्दीतील पुरुष बिट मार्शलसोबत दामिनी पथकही घटनास्थळी दाखल होते. मागील दोन महिन्यात एकूण ४४ ठिकाणी दामिनी पथकाने धाव घेत कॉलची पूर्तता केली आहे.

# अमोल कोल्हेंचे 'ते' विधान बालिशपणा अन् अज्ञानातून

## अमोल कोल्हेंची स्वत:वर संयम ठेवावा : शिवाजी आढळराव पाटलांचा मोलाचा सल्ला

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभेतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे छगन भुजबळ यांना उमेदवारी देणार होते, असा दावा अमोल कोल्हे यांनी केल्यानंतर महायुतीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांचा दावा म्हणजे बालिशपणा आहे. त्यांनी अज्ञानातून अशी वक्तव्य करू नयेत असा सल्ला त्यांनी अमोल कोल्हे यांना दिला आहे. शिवाजी आढळराव पाटील हे मंचर येथे पत्रकारांशी बोलत होते.

महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी भोसरी येथे पार पडलेल्या मेळाव्यात शिरूर लोकसभेसाठी छगन भुजबळ यांना उभं करण्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोक्यात होतं. मात्र, छगन भुजबळ यांनी नकार दिल्यानेच बेडूक उड्या घेऊन राष्ट्रवादीत आलेले शिवाजी आढळराव पाटील यांना उमेदवारी देण्यात आली असा टोला लगावला होता. यावर शिवाजी आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांना चोख प्रत्युत्तर दिलं आहे. अमोल कोल्हे यांना संजय राऊत यांच्यासारखी काहीही बिन बुडाची



विधानं करण्याची सवय लागली आहे. छगन भुजबळ हे राष्ट्रवादीचे असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांची उमेदवारी कशी जाहीर करतील असा प्रश्न उपस्थित करत अमोल कोल्हे यांनी अज्ञानातून अशी बालिश विधाने करू नयेत, असा सल्ला दिला आहे. पुढे ते म्हणाले, संजय राऊत यांच्यासोबत राहिल्याने ते काहीही बडबड करत आहेत. त्यामुळे त्यांनी स्वतःवर संयम ठेवावा, असा मोलाचा सल्ला शिवाजी आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांना दिला आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शक्तिप्रदर्शन

## मुरलीधर मोहोळ, शिवाजीराव आढळराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदार संघातील भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, शिरुर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शक्तिप्रदर्शन केले. जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, डेक्कन जिमखाना, तसेच मध्यभागातून फेरी काढण्यात आल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला.

मुरलीधर मोहोळ, शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केले. मोहोळ यांनी सकाळी ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर, श्री जोगेश्वर मंदिर येथे दर्शन घेतले. तेथून ते कोथरुड येथे गेले. कोथरुड येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी फेरीची सुरुवात केली. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी जंगली महाराज रस्त्यावरील झाशीच्या राणी चौकातून फेरी काढली. जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखानामार्गे आढळराव पाटील यांची फेरी मध्यभागातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाली. मोहोळ यांची फेरी कोथरुड, कर्वे रस्ता, नळस्टॉप, डेक्कन जिमखानामार्गे मध्यभागातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाली.

या फेरीत भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेनेसह महायुतीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वाहतूक नियोजनासाठी पोलीस ठेवण्यात आले होते. वाहतूक बदलांविषयी नागरिकांना माहिती मिळाली नसल्याने गोंधळ उडाला. मोहोळ आणि आढळराव पाटील यांची फेऱ्यात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. कर्वे रस्त्यासह वेगवेगळ्या भागात मोहोळ यांच्या फेरीचे स्वागत करण्यात आले. जेसीबी यंत्रातून पुष्पवृष्टी करण्यात आली. चौकाचौकात होणारे स्वागत आणि फटाक्यांच्या आतषबाजीमुळे फेरी संथगतीने सुरू होती. त्यामुळे डेक्कन जिमखाना, कर्वे रस्ता, विधी महाविद्यालय रस्ता, केळकर रस्ता, लक्ष्मी रस्त्यासह मध्यभागातील बहुतांश रस्त्यांवर कोंडी झाली होती. डोक्यावर उन आणि कोंडीत अडकल्याने नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागले. पीएमपी मार्ग अचानक बदलल्याने प्रवाशांचे हाल झाले. दुपारनंतर मध्यभागातील वाहतूक सुरळीत झाली.





### फेरी संथगतीने; नागरिक कोंडीत

**मोहोळ यांची फेरी कोथरुडमधून सुरू झाली. आढळराव पाटील यांनी जंगली महाराज रस्त्यावरुन फेरी काढली. दोन्ही फेऱ्यात कार्यकर्ते सहभागी झाले होते. मोहोळे यांच्या फेरीचे चौकाचौकात स्वागत करण्यात आले. फटाके फोडण्यात आले. वाहतूक बदलांविषयी नागिरकांना फारशी माहिती नव्हती. त्यामुळे डेक्कन जिमखाना भागासह कर्वे रस्ता, विधी महाविद्यालय रस्त्यासह मध्यभागातील रस्त्यांवर कोंडी झाल्याचे दिसून आले.**

# पुणे ठरले उणे! आंतरराष्ट्रीय उड्डाणात छोट्या शहरांनीही टाकले मागे

## पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी पुणे रेसकोर्स स्थळ जवळपास निश्चित : पोलिसांकडूनही स्थळाची पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळावरून गेल्या आर्थिक वर्षात ९५ लाखांहून अधिक प्रवाशांनी हवाई प्रवास केला आहे. यात ९३ लाखांहून अधिक प्रवाशांनी देशांतर्गत आणि एक लाख ६९ हजार प्रवाशांनी आंतरराष्ट्रीय प्रवास केला आहे. देशांतर्गत प्रवाशांच्या संख्येत पुणे देशात नवव्या स्थानी आहे, मात्र, आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या संख्येत पुण्याचा पहिला १० विमानतळांमध्येही समावेश नाही.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विमानतळनिहाय प्रवासी,उड्डाणे आणि मालवाहतुकीची आकडेवारी जाहीर केली आहे. एप्रिल २०२३ ते मार्च २०२३ या कालावधीतील ही आकडेवारी आहे. या आकडेवारीनुसार, गेल्या आर्थिक वर्षात पुणे विमानतळावरील देशांतर्गत फेऱ्यांची संख्या ६२ हजार ६१६ वर गेली. त्या आधीच्या वर्षात ही संख्या ५८ हजार २६१ होती. त्यात ७.५ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. याच वेळी देशांतर्गत प्रवाशांची संख्या ९३ लाख ५५ हजार ८५६ वर पोहोचली आहे. त्याआधीच्या वर्षात ही संख्या ७८ लाख ६५ हजार ६४४ होती. त्यात आता १८.९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

पुणे विमानतळावरून गेल्या वर्षभरात एक हजार ४२३ आंतरराष्ट्रीय फेऱ्या झाल्या. त्याआधीच्या वर्षात ही संख्या एक हजार १९० होती. त्यात १९.६ टक्के वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय प्रवाशांची संख्या गेल्या वर्षी एक लाख ६९ हजार ६२८ वर पोहोचली. त्याआधीच्या वर्षात ती एक लाख ४१ हजार ५१६ होती. यंदा त्यात १९.९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. पुण्यातील एकूण हवाई प्रवासी संख्येत आंतरराष्ट्रीय प्रवाशांची संख्या दोन टक्क्यांपेक्षाही कमी आहे. आंतरराष्ट्रीय प्रवासी संख्येच्या बाबतीत देशातील पहिल्या १० विमानतळांमध्येही पुण्याचा समावेश नाही. याच वेळी इतर अनेक छोटी शहरे पुण्याच्या पुढे आहेत.

### मालवाहतुकीत घट

पुणे विमानतळावरील मालवाहतूक गेल्या वर्षी ३७ हजार ८४१ टन झाली आहे. त्याआधीच्या वर्षात मालवाहतूक ३९ हजार ३६९ होती. त्यात ३.९ टक्के घट नोंदविण्यात आली. पुणे विमानतळावरील देशांतर्गत मालवाहतूक ३७ हजार ८३३ टन आहे. याच वेळी आंतरराष्ट्रीय मालवाहतूक केवळ आठ टन आहे. आधीच्या वर्षात ती ५५ टन होती.



### आंतरराष्ट्रीय प्रवासी संख्या (एप्रिल २०२३ ते मार्च २०२४)

| विमानतळ | आंतरराष्ट्रीय प्रवासी |
|---|---|
| दिल्ली | १ कोटी ९४ लाख ७० हजार |
| मुंबई | १ कोटी ४३ लाख १८ हजार |
| चेन्नई | ५८ लाख ७९ हजार |
| कोची | ४९ लाख २० हजार |
| बंगळुरू | ४६ लाख ६७ हजार |
| हैदराबाद | ४२ लाख १४ हजार |
| कालिकत | २६ लाख ७६ हजार |
| कोलकता | २४ लाख ६८ हजार |
| त्रिवेंद्रम | २० लाख ५० हजार |
| अहमदाबाद | १९ लाख ७७ हजार |
| पुणे | १ लाख ६९ हजार |

### पुण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील अडथळे

धावपट्टीची पुरेशी नसलेली लांबी नसल्याने मोठी विमाने उतरण्यात अडचणी

धावपट्टीचा विस्तार करण्याबाबत केवळ चर्चेच्या फेऱ्या

सध्या सिंगापूर, दुबई ही दोनच आंतरराष्ट्रीय उड्डाणे

आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या कमी असल्याने मुंबईमार्गे प्रवास

हवाई दलाचे विमानतळ असल्याने उड्डाणांवर अनेक मर्यादा

# निवडणूक यंत्रे शहरात दाखल

## स्ट्राँगरुममध्ये यंत्रे ठेवली बंदिस्त, 24 तास पोलीस पहारा देणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक होत असतानाच मावळ मतदार संघासाठी चौथ्या टप्प्यात म्हणजेच १३ मे रोजी मतदान होणार आहे. चिंचवड विधानसभा मतदार संघासाठी आवश्यक असणारी मतदान यंत्रे उपलब्ध करण्यात आली आहेत. ही यंत्रे थेरगाव येथील स्व. शंकर अण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आली आहेत. सुरक्षेसाठी याठिकाणी २४ तास पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात आलेल्या निवडणूक यंत्रांमध्ये कंट्रोल युनिट ७७९, बॅलेट युनिट ७७९ व व्हीव्हीपॅट ८४९ असे २ हजार ४०७ मतदान यंत्रांचा समावेश आहे. ही रूम सीलबंद आहे. शिवाय सुरक्षेची सर्व काळजी घेण्यात आली आहे. पुरेसा पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे, अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी दिली.



मावळ लोकसभेची निवडणूक चौथ्या टप्प्यात म्हणजे १३ मेला होणार आहे. त्यासाठी विधानसभा मतदारसंघानुसार मतदान यंत्रे तयार करण्याचे काम सुरू आहे. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार चिंचवड विधानसभा मतदारसंघात मतदानासाठी आवश्यक मतदान यंत्रे कोरेगाव पार्क येथील वखार महामंडळाच्या गोडाऊनमधून आणण्यात आली आहेत.ही यंत्र थेरगाव येथे स्ट्राँगरूममध्ये ठेवण्यात आली आहेत. स्ट्राँगरूम सील करण्यात आली आहे. तसेच, स्ट्रॉंगरूम परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत याठिकाणी २४ तास पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

याबाबत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी म्हणाले, पोलिस बंदोबस्तामध्ये मतदान यंत्रे आणली आहेत. ते स्ट्राँगरूममध्ये सुरक्षितपणे ठेवण्यात आली आहेत. याठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### लोकसभा निवडणुकीसाठी 11 हजार 898 मतदान यंत्रे

**» सर्व मतदान यंत्रांची राजकीय पक्षांच्या उपस्थितीत प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण करण्यात आली असून ती सुस्थितीत आहेत. या यंत्रांपैकी सर्व विधानसभा मतदार संघांतील मतदान केंद्रांच्या १४१ टक्के बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १५२ टक्के व्हीव्हीपॅट यंत्रे देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघाच्या आवश्यकतेनुसार ११ हजार ८९८ बॅलेट युनिट, ११ हजार ८९८ कंट्रोल युनिट आणि १२ हजार ७४९ व्हीव्हीपॅट यंत्रांची सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी प्रक्रियेची माहिती दिली.**

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या प्रक्रियेवेळी मावळचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, बारामतीच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी, शिरूर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, ईव्हीएम व्यवस्थापन समन्वयक अधिकारी रूपाली आवळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी प्रमोद बोरवले आदी उपस्थित होते.

वितरणानंतर ही यंत्रे संबंधित विधानसभा मतदार संघाच्या स्ट्रॉंग रूममध्ये आणि पुणे लोकसभा मतदार संघासाठीची यंत्रे भारतीय खाद्य महामंडळाच्या गोदामात सुरक्षा बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. त्या-त्या विधानसभा मतदार संघांतदेखील मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे डॉ. दिवसे यांनी सांगितले. जिल्ह्यातील ८ हजार ३८२ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ११ हजार ८९८ मतदान यंत्रांची जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रकिया करण्यात आली.

# पीएमपीच्या ऑनलाईन तिकीटांचा बट्ट्याबोळ

## मशीन्स व्यवस्थित काम करत नसल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीएमपीच्या ऑनलाईन तिकीट विक्रीच्या मशीन्स व्यवस्थित काम करत नसल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

पीएमपीच्या ऑनलाईन तिकीट विक्रीच्या मशीन्स व्यवस्थित काम करत नसल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. मशिन्स व्यवस्थित काम करत नसल्याने वाहकांवर मशिनसह तिकीट-ट्रे ठेवण्याची वेळ येत आहे.




पीएमपीच्या ऑनलाईन तिकीट विक्री मशीन्सचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसून येत असून यावर पीएमपी प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. सातत्याने मशिन्समध्ये बिघाड होणे, ग्रामीण मार्गांवर इंटरनेट सुविधेचे अडचण असल्याने युपीआय पेमेंट न होणे, तिकीट व्यवस्थित प्रिंट न होणे,

कोरी तिकीटे निघणे अशा प्रकारच्या तिकीट विक्री प्रक्रियेत अडचणी येत असून याचा फटका वाहकांना बसत आहे. स्कॅन कोड प्रक्रियाही संथ असून सामान वाहतुकीचे तिकीट मशीनमध्ये बुक होत नाही. काही ठिकाणी एका तिकिटाच्या मागणीवर अनेक तिकिटे निघतात. त्यामुळे प्रवाशी पैसे देत नाही. परंतु, मशीनमध्ये पैसे मात्र काउंट होतात. त्याचा भुर्दंड वाहकाला बसत असल्याचे एका वाहकांकडून सांगण्यात आले.

### ई-तिकीट प्रणालीस अडचणीची ठरत असलेली कारणे

**» पेपर रोल खराब दर्जाचे असल्याने प्रिंटिंग त्रुटी येणे, मशीन बंद पडल्यावर नवीन मशीन देणे क्रमप्राप्त असताना कंत्राटदारांकडून प्रतिसाद न मिळणे,कंत्राटदारांकडून आगाराच्या ठिकाणी देण्यात आलेले व्यवस्थापकांची सातत्याने गैरहजरी,मशीन्सची सर्विसिंग आणि रिपेअरिंग वेळेवर न करणे,वाहकांच्या तुलनेत सुरळित मशिन्सची संख्या कमी असणे ही करणे आहेत.**

अनेकवेळा मशीन्समधील सिमकार्डचे रिचार्ज संपलेले असते. कंत्राटदारांकडून याबाबत कोणत्याही प्रकारची काळजी घेण्यात येत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याबाबत आगारप्रमुखांकडून सातत्याने लेखी पत्राद्वारे आणि तोंडी तक्रारी करण्यात येतात. मात्र, यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसून येत नाही, याचा फटका वाहकांना आणि प्रवाशांना बसत असल्याचे दिसून येते.

# पोलीस आयुक्तांचा गुंडांना इशारा

## गोळीबाराच्या घटना घडल्यानंतर गुन्हे शाखेने गुंडांची झाडाझडती घेणयास सुरू



**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी पॅटर्न चित्रपटातील दृश्याप्रमाणे पुण्यात गोळीबाराच्या घटना घडल्यानंतर गुन्हे शाखेने गुंडांची झाडाझडती घेणयास सुरू केली.

शहरात गेल्या आठवड्यात सलग चार गोळीबाराच्या घटना घडल्या. मुळशी पॅटर्न चित्रपटातील दृश्याप्रमाणे पुण्यात गोळीबाराच्या घटना घडल्यानंतर गुन्हे शाखेने गुंडांची झाडाझडती घेणयास सुरू केली. यापार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुंडांना इशारा दिला. पुण्यात मुळशी पॅटर्न नव्हे तर कायद्याचा पॅटर्न चालणार, असा इशारा त्यांनी गुंडांना दिला.

गोळीबार आणि वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गुंडांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली. महिनाभरात पोलिसांनी बेकायदा पिस्तुले बाळगल्याप्रकरणी २८ जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ४२ पिस्तुले आणि ७४ काडतुसे जप्त करण्यात आली. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्तांनी गुंडांना इशारा दिला. पुण्यात फक्त कायद्याचा पॅटर्न चालणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त अमोल झेंडे उपस्थित होते. गुंडांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. खून, खुनाचा प्रयत्न, तडीपार, मोक्का कायद्यान्वये कारवाईत जामीन मिळवलेल्या सराइतांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गुंड सामान्य नागरिकांना त्रास देत असतील तर त्यांनी त्वरितपोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यापुढील काळात देखील शहरातील बेकायदा धंद्यांवर कारवाई सुरु राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुणे पोलिसांनी 2 दिवसात तब्बल 500 गुन्हेगारांना बोलवून तंबी दिली. सोशल मीडियावर मात्र काहीजण बॉस, भाईंचे व्हिडीओ अपलोड करताना दिसत आहेत. त्यांच्या याच व्हिडीओवर आता पुणे पोलिसांची करडी नजर असणार आहे. त्यात हातात कोयते दिसले तर क़डक कारवाई करणार असल्याचा इशारा पुणे पोलिसांनी दिला आहे.

नवीन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हेगारी टोळ्या आणि सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार कुख्यात गजानन मारणे, नीलेश घायवळ, बाबा बोडके, बंडू आंदेकर, टिपू पठाण, कंचीले अशा प्रमुख 15 गुन्हेगारी टोळ्यांसह नव्या उभरत्या 50 टोळ्यांतील सुमारे सराईत गुन्हेगारांना परेडसाठी पोलीस आयुक्तालयात हजेरीसाठी बोलावण्यात आले.

कोणताही गुन्हा करायचा नाही. गुन्हेगारीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पाठिंबा द्यायचा नाही. बेकायदेशीर कृत्यात सहभागी व्हायचे नाही, सोशल, असा इशारा गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर यांनी दिले. मात्र तरी सुद्धा काही जणं अजूनही याची गंभीर दखल घेत नसल्याचं दिसून आलं.

पुण्यातील नामचीन गुंडांचे बहुधा त्यांच्या चिल्ल्या पिल्ल्या लोकांनी त्यांच्या भाईंच्या नावाने अनेक अकाउंट बनवले आहेत आणि. कुठल्या ही गुन्हेगारीचे उदात्तीकरण करत असल्याच्या पोस्ट किंवा व्हिडिओ दिसले तर ते अकाउंट तर सस्पेंड होईलच पण ते चालवणारे तरुणांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, जर हातात बंदूक, कोयता घेऊन व्हिडिओ जर सोशल मीडियावर टाकला तर तुम्हाला तुमचा पुढचा मुक्काम जेलमध्येच असेल. असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### सोशल मीडियाचा एक व्हिडीओ जेलही हवा दाखवणार

» 21 व्यां दशकात सोशल मीडियाचा वापर अनेक चांगल्या गोष्टींसाठी केला जातो मात्र ही मिसरूड न फुटलेली आणि स्वताला डॉन समजणारी टोळी या सोशल मीडियाचा गैरवापर करून समाजात एक वेगळं चित्र निर्माण करताना पाहायला मिळत आहे. पण आता पोरांनो तुम्ही जर हातात बंदूक, कोयता घेऊन व्हिडीओ जर सोशल मीडियावर टाकला तर तुम्हाला तुमचा पुढचा मुक्काम जेलमध्येच असेल.

# उद्यान चांगले; पण प्रेमीयुगलांचा वाढला वावर

## उद्यान विभागाचे दुर्लक्ष : उद्यानात सुरक्षारक्षक नियुक्त करण्याची मागणी



**पुणे | प्रतिनिधी**

मोशी गाव पिंपरी चिंचवड महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून बहुतांश भागात विकास, रस्ते, उद्याने विकसित झाली आहेत. महापालिकेच्या उद्यान विभागाकडून मोशी परिसरात उद्यान विकसित करण्यात आली आहे. याचा उपयोग येथील रहिवाशांना होत आहे. परंतु उद्यानात सुरक्षारक्षक नसल्याने प्रेमीयुगलांचा वावर वाढला आहे. त्यामुळे उद्यानात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांना फिरणे कठीण झाले आहे. येथील उद्यानात सुरक्षारक्षक नियुक्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

महापालिकेच्या माध्यमातून मोशी प्राधिकरणामध्ये दोन उद्याने विकसित करण्यात आली आहेत. त्यापैकी एका उद्यानात सुरक्षारक्षक नसल्याने या उद्यानात उद्यान बंद असतानाही छुप्या मार्गाने प्रेमीयुगल येऊन बसतात. पेठ क्रमांक चारमधील पै. भगवान लोंढे उद्यान आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण उद्यान अशी दोन वेगवेगळ्या संकल्पनेनुसार आकर्षक पद्धतीने उद्याने उभारून ती सुशोभीत करण्यात आली आहेत

सकाळी सात ते दहा आणि सायंकाळी चार ते आठ या वेळेत नागरिक त्यांचा आनंद घेत आहेत. पाच वर्षांपूर्वी नव्याने सुशोभित व विकसित केलेल्या या दोन उद्यानांत नागरिकांची मोठी गर्दी पाहण्यास मिळते. नागरिक आपल्या कुटुंब, मित्रमंडळी, नातेवाइकांसह या उद्यानांचा आनंद घेत आहेत.. ओपन जिम नसल्याने शारीरिक कसरती करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने येथे ओपन जिम संकल्पना राबविणे गरजेचे आहे.

### उद्यानात असलेल्या सोयीसुविधा

» मोशी येथील दोन्ही उद्यानात लहान मुलांसाठी खेळणी, ज्येष्ठांना बसण्यासाठी कट्टे, चालण्याच्या व्यायामप्रेमींसाठी जॉगींग ट्रॅक, बॉटल पाम ट्री सारखी विविध प्रकारची मोठी झाडे, लॉन, शोभेची आणि विविध प्रकारच्या फुलझाडांनी ही उद्याने बहरलेली आहेत. दोन्हीही उद्यानात बागकाम करणारे कर्मचारी उपलब्ध असल्याने वेळोवेळी येथील लॉन, झाडे, झुडपे यांना पाणी देऊन, त्यांची मशागत करून देखभाल केली जात आहे.कै. भगवान लोंढे उद्यान हे वस्तीमध्ये असल्याने येथे प्रेमीयुगल येत नाहीत. मात्र, नवनगर विकास प्राधिकरण उद्यान हे वस्तीच्या ठिकाणी नसून, एकांतात असल्याने येथे प्रेमीयुगल घुसखोरी करून प्रवेश करत आहेत. सुरक्षारक्षक नसल्याने त्यांना कोणीही अडवत नाही. ही बाब अन्य नागरिकांना त्रासदायक ठरत आहे.